IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Impact Factor: 7.53
Volume 4, Issue 3, March 2024

# रायगड जिल्ह्यातील गोरेगांव येथील स्थानिक मंदिराचा इतिहास

डॉ. खराडे भारत शांताराम
दोशी वकील आर्ट्स कॉलेज आणि जी. सी. यु. बी. सायन्स आणि कॉमर्स कॉलेज, गोरेगांव-रायगड
bshantaramkharade@gmail.com

**प्रस्तावना:**

गावासारखी गावे अनेक असतात. काही गावे तीर्थक्षेत्र म्हणून प्रसिध्द असतात. तर काही ऐतिहासिक महत्वाची असतात. गोरेगावचा आध्यात्मिक वारसा हा अच्युत स्वरूपाचा असून कथाकिर्तनाचे उपक्रम सातत्याने चालत असल्यामुळे गावाने आपला धार्मिक वारसा जपला आहे. प्राचीन काळी या गावाचे नाव हे "घोडेगाव " असावे असे सांगितले जाते. जवळच्या घोडेघुमच्या जंगलात घोडयांची परीक्षा घेऊनच परीक्षेला उतरलेले घोडे खरेदी केले जायचे. या गावातून कौलांचा व्यापार मोठया प्रमाणात होत असे. श्रीवर्धन, महाड, दासगाव या बंदरातून मोठ मोठे मचवे व गलबते या बंदरात येत असत. शिवकाळात महाराजांच्या सैन्यात उतरण्याची व्यवस्था या गावात होत असे असे कुलाबा गॅझेटमध्ये वर्णन केले आहे.

रायगड या जिल्ह्याला जसा छत्रपती शिवाजी महाराजांच्या वारशाचा इतिहास आहे, त्याच प्रमाणे गोरेगाव या ऐतिहासिक नगरीला हि तोच वारसा लाभला आहे. गोरेगाव, ता. माणगाव पूर्वी घोडेगाव म्हणून ओळखले जाणारे माणगाव तालुक्यातील एक अंतर्देशीय बंदर, सुमारे सहा मैल (माणगाव पासून 10 किमी) अंतरावर आहे. दासगावच्या उत्तर-पश्चिमेस आणि घोड आणि काळच्या संगमाच्या दक्षिणेस दोन मैल(3 किमी) अंतरावर आहे. मुख्य म्हणजे सावित्री नदीचा किनारा गोरेगावला लाभलेला आहे. ज्यावेळी भरती येथे येते त्यावेळी सुमारे बारा टन (50) खंडी) बोटी गोरेगावपर्यंत जात होत्या. परंतु आधुनिकतेचा अतिरिक्त वापरामुळे सध्या गोरेगाव चंदराचे अस्तित्य दिसत नसले तरी ते एक ऐतिहासिक बंदर होते हे मात्र निश्चित. रस्त्याच्या तुलनेत समुद्रमार्गे वाहतुकीचा फारसा प्रयत्न केला जात नाही, कारण कोकण-गोवा राज्य महामार्गाने देशाच्या सर्व भागात मालाची वाहतूक करणे अत्यंत आर्थिक आणि सुलम केलेले आहे. गोरेगाव हे बहुधा टॉलेमी यांच्या भूगोल या पुस्तकात याचा उल्लेख हिप्पोकुरा (घोडेकुला) असा आलेला आहे. गोरेगाव हे खूप जुने व्यापारी केंद्र आहे. करटण तसे काही पुरावे आढळतात.

**घोडेगाव:**

गोरेगांव ( माणगाव ता, १८° ०५' ऊ, ७३° १५' पू) घोडेगाव म्हणून प्राचीन काळी प्रसिध्द असलेले हे बंदर दासगावच्या वायव्येस ९.६५ कि.मि वर, व घोड़ (गोद) आणि काळ नद्यांच्या संगमाच्या दक्षिणेस ३.२१

कि. मी वर आहे प्राचीन काळी हे व्यापारी बंदर होते परंतु कालांतराने येथिल सागरी वाहतुक अत्यंत कमी झाली. टॉलिमीने ( इ. स. १५०) गोरेगांवचा उल्लेख हिप्पोकुरा (घोडेकुला) असा केला असुन बालीपाटणा व हिप्पोकुरा हे सैमुल्ला म्हणजेच चौलच्या दक्षिणेस असल्याचे नमुद केले आहे बालीपाटणा हे पालेपट्टण (पाले नगर) म्हणजेच महाडच्या ३ कि. मी. सर बुद्धीस्ट लेणी असलेले पाले असावे तर हिप्पोकुरा हे साष्टी म्हणजे सालसेटीमधील घोडबंदर असावे. गोरेगांवच्या जवळ घोडेघूम हे गांव आहे, काही विचारवंताचे असे मत आढळते कि, या गांवाच्या नावावरून गोरेगांव हे नाव पडले असावे परंतु घोड्यांच्या व्यापार चालत असल्या कारणाने यागावास गोरेगांव हे नांव पडले असावे असा सौर निघतो. 'परंतु घोडेगावला असलेल्या नौकानयनाच्या सोयीयरून ले आताचे गोरेगांव असावे इ. स १७१८ पर्यंत घोडेगाव स्थानिक उप-विभागाचे मुख्यालय होते त्या नंतर हबशीनी ते पेशव्याच्या स्वाधीन केले सन १८२६ मध्ये घोडेगाव हे पुण्याहुन देव व कुंभा घाटमार्गे जाण्या जाणा-या मार्गावरील प्रमुख ठिकाण होते

गोरेगांव च्या उत्तरेकडील एका टेकडीवर अदमासे ८२१ वर्षपूर्वि बांधलेले मल्लीकार्जुन अथवा सिध्देश्वराचे मंदिर असुन त्यातील लिंग स्वयंभू असल्याची भाविकांची श्रध्दा आहे. इ. स. १९०४ मध्ये ( शके १८२६) गोविंदशास्त्री रानडे यांनी पंचमुखी गायत्री मंदिर बांधले. हे शाक्त संप्रदायाचे देऊळ जागृत स्थान असल्याचे मानतात. गायत्री देवीची मूर्ती हि  संगमरवरी असुन ती जयपुर येथुन आणली आहे असा पुरावा आढळतो.

**गोरेगावातील मंदिरे:**

**श्रीदेव बहिरी उर्फ भैरवनाथ मंदिर :**

या देवस्थानाला बगाड देवस्थान असेही म्हणतात. भगवान शंकरांच्या अनेक पार्षदापैकी एक श्रेष्ठ गण म्हणजे भैरवनाथ उर्फ काळभैरव होय. गोरेगांव येथील भैरवनाथाचे मूळगांव बहिरी असे असून या बहिरी देवाचे दोन बंधू वीर व गोंदिरबा असे सर्वजणगावाचे प्रमुख दैवत म्हणून ओळखले जातात. चैत्र शुध्द १४ रोजी श्रीभैरवनाथाची यात्रा भरते. वीराचे स्थान गावातील पाण्याच्या टाक्याजवळ असून मल्लीकार्जुन डोंगरावर शंकराचे मंदिरासमोरील छोटीशी घुमटी श्री बहिरीचे दुसरे बंधू गोंदिरबा यांच्या नावाने प्रसिध्द आहे. परंपरेप्रमाणे यांत्रेच्या दिवशी गावच्या होळीच्या नेबाजवळील चौकातून देवाचे मानकरी आजही श्री भैरवनाथ यांच्या बंधूना यात्रेसाठी बोलावतात. हे आमंत्रण एकढया लांबून का दिले जाते हे मात्र एक आश्चर्य आहे. हे आमंत्रण करताना गावकरी म्हणात वीरा का गोंदिरबाया चैनीचा सभा भरला आहे तेव्हा आपण या सभेला चला' एकूण या देवाच्या तीन सभा असतात चैती, पौति आणि आषाढातील पाल जत्रा. सिंधुदुर्ग जिल्हयातील कुणकेश्वर रायगड जिल्हयांतील हरिहरेश्वर आणि गोरेगांव येथील गोंदिरबा मंदिर या मध्ये विलक्षण साम्य असल्याचे सांगीलते जाते. विशेषतः शिवपिंडीची रचना, दीपमाळा व बांधकाम यामध्ये हे विलक्षण साम्य आहे. या गोंदिरबा मंदिराजवळ काही प्राचीन सप्तमातृकांच्या भग्नमूर्ती ही आहेत. या गावचा ऐतिहासिक वारसा शोधण्यासाठी येथील भग्नदीपमाळा व या मूर्तीचा मोठा उपयोग होऊ शकेल. श्री भैरवनाथाचे मंदिर

IJARSCT

ISSN (Online) 2581-9429

International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)

International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal

Impact Factor: 7.53

Volume 4, Issue 3, March 2024

दक्षिणाभिमुख असून यात्रेच्या दिवशी मंदिरासमोरील बगाडावर पारंपारिक पध्दतीने लाट फिरवली जाते. ही लाट ऐनाच्याझाडाची असते. ज्या गावात ऐनाचे झाड उपलब्ध होईल त्या गावातून ही लाट मिरवणुकीने येथे आणली जाते. देवस्थान जागृत असल्याने भाविक या देवस्थानाला नवस बोलतात.

देवाच्या लाटेलाही नवस बोलण्याची प्रथा असून देव नवसाला पावतो अशी भाविकांची श्रध्दा आहे. त्यामुळेच मंदिरांत देवाला गा-हाणे घालण्याचा कार्यक्रमही होतो. लाटेचा खर्च देण्यास देवावरील श्रध्देमुळे अनेकजण आपणहून तयार असतात. या यात्रेमध्ये गळ लावण्याची प्रथा ही पूर्वी अस्तित्वात होती. हिंदु बुरूड, कुंभार आणि बौध्द लोक अशा त-हेने स्वतःच्या पहिला गळ लावून घेत असत व स्वतःला लाटेला टांगून घेत असत. परंतु आजमात्र ही प्रथा बंद झाली असून आज केवळ त्या गळांची पूजा मात्र केली जाते.

**श्री क्षेत्र वरदेश्वर:**

गावातील दुसरे जागृत देवस्थान म्हणून श्रीक्षेत्र वरदेश्वराचा उल्लेख केला जातो. श्रीक्षेत्र मल्लिकार्जुन येथील भगवान शंकर भक्तांच्या इच्छेसाठी आपणहून इथे अवतरले अशी आख्यायिका या स्वयंभू मंदिराचे संदर्भात ऐकावयास मिळते. उपाध्ये वंशियांसाठी देवाने आपली जागा सोडली आणि तो येथे आला. अशा प्रकाराची कथा अत्यत्र क्वचितच ऐकावयास मिळेल या मंदिरासमोर ही एक प्राचीन दीपमाळ आहे. मंदिराचे डाव्या बाजूस श्री जनताचे मंदिर असून उजव्याबाजूस श्रीरामाचे मंदिर आहे. महाशिवरात्रीचे दिवशी पारंपारिक पध्दतीने ब्राम्हण समाजातर्फे देवस्थानचा उत्सव साजरा केला जातो. माघी चतुर्थीला मराठे कुटुंबियांतर्फे साजरा केला जातो. या मंदिरात राम, लक्ष्मण, सीता व हनुमानाच्या देखण्यामूर्ती आहेत. श्री वरदेश्वर मंदिराचा आणखी एका विशेष म्हणजे इतरत्र क्वचितच आढळणारी पाषाणाची नंदीची मूर्ती शंकरांकडे तोंड करून उभी असलेली आपणास पहावयास मिळते. सामान्यतः मंदिराच्या बाहेर मूळ पिंडी पासून काही अंतरावर बसलेल्या अवस्थेत नंदीची मूर्ती असते. परंतु येथे मात्र शंकराचे पिंडीच्या जवळच मूळ गाभा-याला जवळजवळ टेकलेल्या अवस्थे नंदीची उभी मूर्ती आहे. जणू काय स्वारीला दूरवर फेरफटका मारण्यासाठी जायचे असल्यामुळे सिध्द असलेले हे महाराज वृषभध्वजाची वाट पाहात उभे आहेत. आतमध्ये गौरीची प्राचीन मूर्ती होती. त्याऐवजी अलिकडेच एक नवीन मूर्ती प्रतिष्ठीत करण्यात आली आहे. मंदिर थोडेसे उंचावर असल्याने दर्शनाला जाणा-या भाविकांची संख्या तुलनेने कमी आहे. मंदिर परिसर शांत असून समोरच रामाचा तलाव आहे.

**श्री क्षेत्र मल्लिकार्जुन:**

गावाजवळील टेकडीवर हे प्राचीन स्वयंभू शिवमंदिर असून या नावावरून ही टेकडी देखिल मल्लिकार्जुन म्हणून ओळखली जाते. पूर्वी या मंदिरात ही शिवरात्रोत्सव साजरा केला जात असे. अलिकडील काळात येथे केवल त्रिपुरी पौर्णिमेला देवस्थान समोरील दीपमाळेवर त्रिपूर लावण्याचे काम केले जाते. काही समाजकंटकांनी पिंडीवरील शालूखी फोडण्याचा मान केला होता, या मंदिराला लागूनच श्री गजाननाची अर्धनारी

अवस्थेतील मूर्ती एक घुमटीत बसवलेली असून समोरील सभा मंडप छतरहिन अवस्थेत कित्येक वर्षे आहे. दोन मंदिरांच्या मधल्या जागेत पादुका असून प्राचीन काळी तेथे एक मोठा वाघ मारण्यात आला होता असे ग्रामस्थ सांगतात. या देवस्थानचा उल्लेखही कुलाबा गॅझेटमध्ये आहे. जागृतीमंडळ गोरेगांव या संस्थेने या मंदिराचा जीर्णोद्धार केला आहे. मधल्याकाळात हिटेकडी ओसाड अवस्थेत होती. परंतु आज वनखात्याच्या कृपेमुळे हा डोंगर ही हिरवा शाला आहे. श्रीगणपतीला कोणत्याही कार्याची सुरुवात होण्यापूर्वी नमस्कार करतात म्हणून शिवपुराण सांगते, 'कार्यारंभेषु पुज्योत्रयमं इति तस्मैवरं देवो' म्हणून प्रत्येक मंदिरात किंवा मंदिर शेजारी गणपतीची मूर्ती वा मंदिर आहे. क्वचित मंदिराच्या प्रवेशव्दारावरही श्री गजाननाचे स्थान आहे. मंदिराकडे जाणा-या पाय-यांचाही जीर्णोध्दार पितांबर ट्रस्टने केला आहे.

**श्री विठ्ठल रखुमाई मंदिर:**

लाकडावरील कोरीव कामासाठी प्रसिध्द असलेले हे मंदिर चां.का.प्रभू समाजाचे मानले जाते. या देवस्थानाबद्दलची विशेष माहिती मध्यंतरी 'कोकण कडा' या साप्ताहिकात प्रसिध्द करण्यात आली होती. या मंदिराला २५० वर्षाचा इतिहास असून मंदिरामध्ये विठ्ठलरखुमाईच्या मुर्ती बरोबरच बाण (शंकर) ही पाहावयास मिळतो, विष्णू मंदिर म्हणून बांधण्यात आलेल्या या मंदिरात विष्णूची मात्र स्थापना होऊ शकली नाही. विठ्ठल मूर्तीचे डावे बाजूच्या कोनाडयात भग्न झालेली विष्णूमूर्ती ठेवण्यात आली आहे. मधल्याकाळात या मंदिराला अवकळा प्राप्त झाली होती, परंतु आज मात्र मंदिर सुस्थितीत आहे. ४/५ वर्षापूर्वी येथे श्री गजानन महाराज (शेगांव) यांची मूर्ती बसविण्यात आली असून श्री विठ्ठलाचे त श्रीगजानन महाराजांचे भक्त दर्शनासाठी सातत्याने येत असतात. चालू वर्षी श्री गजानन महाराजांच्या प्रकट दिनांचा पालखी सोहळा देखिल या मंदिरात भाविकांनी व संबंधीत मानक-यांनी साजरा केला, मंदिराच्या समोरील दीपमाळेमध्ये गरूडाची व मारूतीची मूर्तीअसून समोरील बाजूस श्रीगजाननाची मूर्ती आहे. येथील गजाननाची प्राचीन मूर्ती भग्न झाल्यामुळे त्या ठिकाणी श्री गजाननाची नवीन मूर्ती बसविण्यात आली आहे.

**श्री विष्णू मंदिर:**

विष्णूतलावाजवळच हे पूर्वाभिमूख विष्णू मंदिर असून विष्णू व लक्ष्मींच्या सुंदर मूर्ती मंदिरात आहेत. गर्भागाराचे बाहेर विष्णूपदही आहे. मूळचे हे मंदिर जोशी कुटुंबियांचे परंतु गोकुळअष्टमीचा उत्सव मात्र शंभर वर्षाहून अधिक काळ मोने कुटुंबिय करतात. पूर्वी गोकुळ अष्टमीचा व आषाढी कार्तिकीचा उत्सव श्री विठ्ठलरखुमाईचे मंदिरात साजरा होत असे. आजमात्र या पैकी गोकुळ अष्टमीचा उत्सव विष्णुमंदिरात साजरा केला जातो. या मंदिरा शेजारी असलेला चौघरी प्राचीन काळापासून असून त्याची मालकी श्री. बच्चूभाई उर्फ चंद्रकांत शेट यांचेकडे आहे. मंदिराचे समोर विहीरीजवळ असणारी समाधि मिखाडकर जोश्यापैकी कोणाची तरी असावी असे सांगितले जाते. त्यांच्याजवळ वडाचे मोठे झाड असून वटपौर्णिमेला अनेक स्त्रिया या वडाची पूजा

करतात. मंदिरामध्ये अलिकडील काळात एक यज्ञकुंडही तयार करण्यात आले असून २/३ वेळा तेथे विष्णु मात्र केला गेला आहे. मंदिरात अधून मधून चार्तुमास प्रवचन केले जाते.

**श्री गायत्रीदेवी मंदिर:**

या मंदिराचे बांधकाम एका दिवसात पूर्ण व्हावे लागले असे सांगतात. मूळ रानडे वाशियांनी हे मंदिर बांधले. त्याबद्दल एक आख्यायिका ही सांगितली जाते ती अशी मंदिर बांधकामचा संकल्प रानडे यांनी केला असता देवीने स्वप्नात दुष्टांत देऊन तसे करू नये असे सुचविले. परंतु रानडे नी आग्रहाने हे मंदिर उभारून आतमध्ये पंचमुखी गायत्रीचे सिध्द यंत्र स्थान करण्यांत आले असून नवरात्री मध्ये देवीचा उत्सव नवचंडीयाग आदी कार्यक्रम केले जातात. मंदिराच्या समोर दीपमाळ असून आतमध्ये लालरंगाची श्री गजाननाची मूर्ती असून काहीजणांच्या मते ती प्रवाळयाची आहे. पूर्वी या देवी मंदिरात संस्कृत पाठशाळा चालविली जात असे. संस्कृतग्रंथ होते. परंतु आनमात्र या दोन्हीही गोष्टी येथे नाहीत. मधल्या काळात मंदिरालाही अवकळा प्राप्त झाली होती. परंतु श्री कलावती आईच्या अनुयायांनी आज या मंदिरात भजन, बालोपसाना इत्यादी उपक्रम चालवले असल्यामुळे आज हे मंदिर सुस्थितीत आहे

**श्री लक्ष्मीनारायण मंदिर:**

बाजारपेठेमध्ये हे प्रशस्त मंदिर असून हे मंदिर सहजगत्या लक्षात येत नाही. पूर्वी या मंदिरात कामनकादशीचा नऊ दिवस उत्सव साजरा केला जात असे. सध्या फक्त वामन व्दादशीचा दिवस साजरा केला जातो. या मंदिराची मालकी श्री. चंद्रकांत शेट यांजकडे आहे. मंदिर उत्तराभिमुख आहे. वामनद्वादशीचा उत्सव इतरत्र फार क्वचित साजरा केला जातो. ज्या कुटुंबियात पयोव्रत घेतलेले असते असे कुटुंबिय हा उत्सव साजरा करतात असे सांगितले जाते. पुत्र प्राप्तीसाठी हा पयोव्रताचा विधी भागवत पुराणात सांगितला आहे. या संबंधीची अधिक माहिती संबंधित वंशंजाकडून मिळू शकली नाही.

**श्री ठाकूरव्दार मंदिर:**

सध्या गुजराथी समाजाच्या मालकीचे असणारे हे मंदिर पूर्वी कासार समाजाच्या चंडिकादेवीचे स्थान असावे असे मानले जाते. अर्थात काही जणांच्या मते मात्र चंडिकादेवीचे स्थान इतरत्र होते. या मंदिरात बसविण्यांत यावयाची राधाकृष्णाची मूर्ति काही कारणास्तव मंदिरात प्रस्थापित होऊ शकली नाही. या मंदिरात पाषाणाची मूर्ती पाहावयास सापडत नाही. घरातील देवांप्रमाणे या मंदिरात देव असून गोकुळ अष्टमीचा व श्री रामनवमीचा उत्सव येथे गुजराथी समाजाव्दारे साजरे केले जातात.

**श्री शनिचा पार:**

जुन्या बाजारपेठेत एका मोठ्या झाडा खाली हा शनिचा पार होता. आज वादळामध्ये ते झाड उजाळून पडल्याने शनि देव वरील छत हरवले आहे. एका छोटया घुमटीत आज ती मूर्ती आहे.

**श्री दक्षिणाभिमुख मारूती:**

या मंदिरातील मारूतीची मूर्ती विशालकामा असून त्याचे तोंड दक्षिणेकडे आहे. मारूतीची मूर्ती उग्ररूपातील असून इतरत्र अशी क्वचितच आढळेल. पूर्वी फडाच्या माळावर असणारी व्यायामशाळा नंतर या मंदिरात आणण्यात आली. या मंदिरात ये जा करणा-यांची संख्या मर्यादित असून येथे कोणता उत्सव साजरा केला जातो असे ऐकिवात नाही. मध्यतरी बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी शनिवारी आरतीचा कार्यक्रम सुरू केला होता. परंतु त्यामध्येही सातत्याचा अभाव आहे. दुर्लक्षित असूनही हे मंदिर तसे सुस्थितीत आहे.

**श्रीकृष्ण मंदिर:**

गावातील कुंभारवाडा म्हणून प्रसिध्द असलेल्या विभागात वैशाख शु. ५ रोजी श्री गुरलीधर श्री कृष्णाच्या मूर्तीची स्थापना करण्यात आली. या मंदिरात भजनपूजनाचे नैमित्तक कार्यकम साजरे केले जातात, श्रावणमध्ये ग्रंथ वाचनाचा, गोकुळ अष्टमीचा उत्सव साजरा केला जातो. सध्या या मंदिराचे जीर्णोध्दाराचे काम चालू असूनही कोणाकडेही वर्गणी न मागता देणगी न मागता हे कार्य चालू आहे. देणगी द्यावयाची असल्यास संपूर्ण विश्वासाने आणि परमश्रध्देने भाविकाने ती श्रीकृष्णाचे पायाशी ठेवावी कोणताही प्रकारची पावती फाडली जाणार नाही आणि कोणाच्याही नांवाचा उल्लेख मंदिरात असणार नाही, कारण माणसाच्या नावाने मंदिर खराब करण्याची ग्रामस्थांची तयारी नाही. हा एक अत्यंत चांगला निर्णय असून त्यामुळे योग्य व्यक्तिीचीच मदत देवस्थानला होणार आहे. अर्थात मंदिराचे काम पूर्ण होईल. असा ठाम विश्वास असून कार्यपूर्तीची काळजी ईश्वरालाच आहे अशी त्यांची श्रध्दा आहे.

**श्रीकृष्ण मंदिर गवळ आळी:**

४/५ वर्षापूर्वीच हे छोटेसे मंदिर उभारण्यात आले असून येथे ही नैमित्तक भजन पूजनाचे कार्यक्रम होतात. तुकाराम बीजेचा मोठा कार्यकम आता हया मंदिरात होतो. मंदिरातील श्रीकृष्णाची मूर्ती रेखीव आहे. मंदिर छोटेसेच आहे.

**श्री म्हसोबा मंदिर:**

हौदाच्या आळीला लागून एक म्हसोबा मंदिर आहे. हा म्हसोबा रात्री भैरीला भेटायला जातो अशी आख्यायिका आहे. तो ज्या मार्गाने जातो तो मार्ग काझी हया इसमाने काही वर्षापूर्वी बंद केला तर त्याला व त्याच्या घरच्यांना खूप त्रास झाला हया अनुभवांनतर त्याने तो मार्ग खुला केला. मग त्याचा त्रास थांबला

असे म्हणतात. म्हसोबा मंदिराची जागा कै. सी.पी. अधिकारीच्या मालकीची आहे. मंदिरात केवळ एक दगड आहे. त्याल छप्पर नाही. तसे ते बांधयचे नाही अशी लोकांची श्रध्दा आहे. बुवाच्या यात्रेच्या वेळी मल्लिकार्जुनच्या जवळ असणा-या गोंदिरला व त्याला मेंढयाचा नैवेद्य दिला जातो

**श्री वेताळ मंदिर**

हयाही मंदिराच्या डोक्यावर छप्पर नाही. म्हसोबाच्या मंदिरात जसे आकारहिन दगड आहेत तसेच इथेही दगड आहेत. काही लोक हयांची पूजा करतात.

कालकाई/काळभैरविचे मंदिर: या मंदिराची पूर्ण देखरेख आणि आर्थिक जमंदिराबाबदारी ही बुरूढ समाजा कडे आहे. ह्या मंदिरातील मूर्ती ही झोपलेल्या आवस्थेत (पहुडलेल्या) आहे. मानवी मनातील भीती या वृत्तीमुळे कदाचित उपरोक्त समाजातील किंवा इतर धर्मियांनी देखील या मौर्तीला हलविण्याचा प्रयत्न कोणी केलेला आढळत नाही. आज हे मंदिर उघड्या जागेत आहे. परंतु आज बुरूढ समाजातील पुढारी लोकानी कटडा बांधला आहे. या मंदिराचा संबध भैरव मंदिराशी जोडला जातो, कारण भैरवाच्या उत्सवा आधी या देवीला नैवेद्य दिले जाते नंतरच भैरवाचा उत्सव भरला जातो.

**मुस्लिम समाजाची मशिद व दर्गा:**

मुस्लिम समाजाची एकच मशीद गोरेगांवमध्ये तीनशे वर्षापासून आहे. सध्या ती नव्याने बांधली जात आहे. तसेच येथे पाच जुने दर्गे आहेत.

**१) वली महमदशहा टोळ हयांचा दर्गा:**३३० वर्षापासून येथे अस्तित्वात आहे. वली महमदशहा टोळ हयांना पेशवे सरकारने जमिनी वतन दिल्या होत्या. वतन जमिनीचाताम्रपट त्यांना देऊन वली महमदशहा हयांनी हिदू-मुस्लिम समाजासाठी केलेल्या कार्याचा गौरव या ताम्रपटामध्ये केलेला आहे. हा मोडी ताम्रपट अजूनही मुस्लिम समाजामध्ये आहे.

२) **दाऊद मलिक शहा हयांचा दर्गा बहिर**, गोंदिर व वीर हया तीन भावांच्या नावाने हा दर्गा ओळखला जातो. हया तीन भावांपैकी वीर हयाने मुस्लिम धर्म स्विकारला. त्यावेळी बहिर हयाने अशी इच्छा प्रकट केली की माझ्या उत्सवाच्या वेळी हयाने ही उपस्थित रहावे. हा बहिर म्हणजे इथला सुप्रसिध्द भैरवनाथ. यामुळेच भैरवनाथ उत्सवाच्या वेळी (जत्रेच्या वेळी) या दर्ग्याला मानाचे निमंत्रण दिले जाते. वीर ला पालखीने आणले जाते. वतनदार म्हणून मुस्लिम समाजातील टोळ, बांगी, पानसरे, म्हैसकर हया घराण्यांना मान दिला जातो.

इतर तीन दर्गाची सुसंगत माहिती मिळू शकली नसली तरी त्यांची नावे पुढील प्रमाणे आहेत. लाडलेपीर, हजरत गैबन शहा, हजरत अली काझा, कमरअली दुर्वेश इत्यादी दर्गे आढळतात.

**३) मशिदीला देणगी:**पूर्वी काळ नदीवरून होडीची वाहतूक चाले. ही वाहतूक चालविण्यासाठी लिलाव पुकारला जात असे. जो माणूस होडीच्या वाहतूकीची जबाबदारी घेईल त्यातून येणा-या उत्पन्नाचा काही भाग गोरेगांव मशिदीला द्यावा असा जंजि-यांच्या सिद्दिने हुकूम काढला होता आणि मशिदीच्या खर्चाची सोय केली होती.

IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Impact Factor: 7.53
Volume 4, Issue 3, March 2024

**बुध्दविहार**

गोरेगाव व चिंचवलीच्या सीमेवर गवळ आळीला लागून हे बुध्दविहार आहे. हे बौध्दविहार साधारण २३ वर्षापूर्वी बांधले गेले. १९७४ साली त्याचे भूमिपूजन झाले. १९८१ साली प्रत्यक्ष कामाला सुरवात झाली व १७ मे १९८७ साली ते बांधून पूर्ण झाले. मा. ए.आर. अंतुले यांच्या शुभहस्ते त्याचे उद्घाटन झाले. हे विहार बांधण्यासाठी श्री. रामचंद्र दोशी वकील यांनी आपली जागा दिली. तर आर्थिक सहाय्य महाराष्ट्राचे मुख्यमंत्री बॅ. ए.आर. अंतुले यांनी केले. इतर मान्यवरांनी देखील या कामात मोलाची मदत केली. त्यांची यथोचित नोंद विहाराच्या देणगीदारांच्या यादीत घेतली गेली आहे. सध्या विहाराचे काम नारायण साळवी गुरुनी पाहतात.

समारोप :-

उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने पाहता असे म्हणूता येते की, रायगड जिल्हा हा छ. शिवाजी महाराजांच्या कार्याने उजळून निघाला आहे.छशिवाजीआणि मध्ययुगाच्या काळातएकनावाजलेलीबाजारपेठम्हणून गोरेगावहीप्रसिद्धहोती. गोरेगांवलात्यामुळेसांस्कृतिकआणिधार्मिकवारसालाभलाआहे. गोरेगावमध्येअसणा-या विविधतळयाचाआणिबाजारपेठेच्यारचनेचाअभ्यासकेल्यासवेगळाइतिहाससमोरयेण्याची शक्यताआहे. उपरोक्तपेपरचाउद्देशहाधार्मिकवारसाकसाजोपासला जात आहे, आणि त्यामुळे इतिहासाचे जतन केले जात आहे. याची माहिती प्रकाशित करणे हा आहे. यामुळे इतर विषयांकडे न पाहता फक्त मंदिर आणि इतर धर्मियांची असणा-या मंदिरांवर प्रकाश टाकण्यात आला आहे.

संदर्भ :

१. कुलाबा गॅझेट, संपादक डॉ. कि.का. चौधरी, मुंबई, दर्शनिक विभाग, महाराष्ट्र शासन १९९३

२. क्षितीज अंक प्रकाशन वर्ष १९९७ (महाराष्ट्र दिन विशेष अंक ९७)

३. गोरेगावातील मंदिर ९ जानेवारी ते २० जानेवारी यादरम्या मंदिराची पाहणी आणि निरीक्षण

४. ९ फेब्रुवारी २०२४ रोजीची मुलाखत: श्री नाना महाले (गोरेगाव)